# Mumbai University 55th Youth Festival 2022

SSPM's college of engineering student Ms Sukanya Gaonkar won prize in Mumbai university 55th youth festival " On the spot painting " event.

## मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवात एसएसपीएम अभियांत्रिकी महाविद्यालयाची विद्यार्थीनी सुकन्या गावकरचे यश

**कणकवली(प्रतिनिधी)**

मुंबई विद्यापीठाच्या सन २०२२ च्या ५५ व्या युवा महोत्सवाच्या अंतिम फेरीमध्ये सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाची विद्यार्थीनी कुमारी सुकन्या गावकर हीचे घवघवीत यश संपादन केले.

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रा. कल्पेश कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २८ सप्टेंबर २०२२ रोजी मुंबई विद्यापीठात संपन्न झालेल्या ५५ व्या युवा महोत्सवाच्या अंतिम फेरीमध्ये महाविद्यालयाच्या मेकॅनिकल विभागाची विद्यार्थीनी कु. सुकन्या गावकर हीने ऑन द स्पॉट पेंटिंग या स्पर्धा प्रकाराच्या अंतिम फेरीमध्ये सहभाग घेतला.



या प्रकारात मुंबई विद्यापीठा अंतर्गत असलेल्या महाविद्यालयामधुन ४१५ विद्यार्थी सहभागी झालेले पैकी कु. सुकन्या गावकर ही सिंधुदुर्ग जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारी एकमेव विद्यार्थीनी होती.

कु.सुकन्या गावकर हीने ऑन द स्पॉट पेंटिंग स्पर्धेत विजेतपद संपादन केले. या करीता स्टुडंट कोऑर्डीनेटर म्हणून कु. चैतन्य आरेकर, कु. योगीता लोके, कु. तन्वी शिरसाट व कु. तन्वी पाडावे यांनी काम पाहीले.

सुकन्या गावकर हीचे संस्थेच्या अध्यक्षा सौ. निलमताई राणे, उपाध्यक्ष माजी खासदार श्री. निलेश राणे, सचिव आमदार नितेश राणे, प्राचार्य डॉ. अनिश गांगल, प्रशासकीय अधिकारी श्री. शांतेश रावराणे, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.


मुंबई विद्यापीठ
Lifelong


मुंबई विद्यापीठ
विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' पथ, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०
University of Mumbai
University of Mumbai
Vidyapeeth Vidyarthi Bhavan
'B' Road, Churchgate, Mumbai - 400 020
NOTICE